" अहमदनगर महानगरपालिकेतर्फे वनमहोत्सवानिमित्त विविध प्रभागांमध्ये वृक्षारोपण "

अ.नगर दि.४ - सन २०१६ च्या पावसाळयात दि.१ जुलै २०१६ या दिवशी २ कोटी वृक्ष लागवड करण्याचा कार्यक्रम राज्य सरकारने वनविभागाच्या माध्यमातून आखलेला होता. त्याचाच एक भाग म्हणून व १ जुलैच्या पुर्वसंध्येला अहमदनगर महापालिकेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून मा.महापौर श्री.अभिषेक कळमकर यांच्या हस्ते झोपडी कॅन्टीनजवळ माउली सभागृह येथे वृक्षारोपण करुन या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

सदर वृक्षारोपणाच्या अनुषंगाने मनपास एकूण ४१०० वृक्षांची लागवड करणेबाबत मा.जिल्हाधिकारी यांचेमार्फत उद्दिष्ट ठरवून देण्यात आले होते.

तसेच या काळात रेसिडेन्शिअल हायस्कूल, जाधवनगर, राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालय, जनकल्याण समिती नगर दक्षिण बालिकाश्रमरोड, सामाजिक समता विचारधारा फौंडेशन सिध्दार्थनगर, पार्वतीबाई म्हस्के प्राथमीक विदयालय पाईपलाईन रोड, बिशपलॉईड कॉलनी, मनपा पंपींग स्टेशन परिसर विळद, केडगांव प्राथमीक शाळा, केडगांव उर्दु शाळा, केडगांव शिवाजीनगर, केडगांव देवीरोड, शाहुनगर, महात्मा ज्योतिबा फुले विदयालय सावेडी, एस.एस.मोहिते विदयालय भुषणनगर, अण्णाभाउ साठे प्राथमीक विदयालय, तोफखाना, जिल्हापरिषद प्राथ.शाळा फकिरवाडा, मनपा शाळा गांधीनगर बोल्हेगांव, एकवीर चौक ते जुना पिंपळगांव रस्ता, महाराष्ट्र बालक मंदिर लालटाकी, सिव्हील हॉस्पीटल, तवलेनगर, चेडे हॉस्पीटल, तारकपूर, लक्ष्मी कॉलनी तपोवन रोड, नय्यर इंग्लिश स्कूल, बायजाबाई सोसायटी, सेंट मोनिका स्कूल तारकपूर, तपोवन मार्ग, पाईपलाईनरोड दुभाजक, रोटरी क्लब व इंडियन मेडीकल असोसिएशनमार्फत महावीरनगर येथे, युवक बिरादरीमार्फत आनंदऋषी हॉस्पीटल परिसर, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, मनपा शाळा आदर्शनगर, ओंकारनगर, श्रमिकनगर बालाजी मंदिर, तागडनगर, श्रीकृष्णनगर, डॉन बास्को कॉलनी, नंदनवन नगर, पवननगर, गजराजनगर, बोरुडे मळा, फुलारी पेट्रोल पंप ते आयुर्वेद उदयान पर्यंत, वडगांवगुप्ता रोड, वन विभाग ते दर्गादायरा रोड, मुकुंदनगर, मोतीबाग हौ.सोसा. केडगांव, रेणुका कॉलनी ओपन स्पेस केडगांव, शिवाजीनगर ओपनस्पेस, ज्ञानाई वारकरी शिक्षण संस्था केडगांव, अ.नगर कॉलेज, सिध्दीविनायक सोसायटी ओपन स्पेस, पत्रकार चौक, तारकपूर रोड, भोसले आखाडा परिसर, समता कॉलनी, विनायकनगर, बुरुडगांवरोड, आंधळे चौरे नगर ओपनस्पेस, महात्मा फुले चौक मार्केटयार्ड, भवानीनगर ओपनस्पेस, सारसनगर ओपनस्पेस इत्यादी ठिकाणी मनपामार्फत तसेच लोकसहभागातून एकूण ४७०० वृक्षरोपांची लागवड करण्यात आली.

तसेच मा.महापौर सौ.सुरेखा संभाजी कदम यांच्या हस्ते व नगरसेवक श्री.अनिल बोरुडे, डॉक्टर्स असोसिएशनचे सदस्य यांचे उपस्थितीत अमृतकलश सोसायटी बोरुडेमळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

त्याचप्रमाणे श्रीकृष्णनगर येथे मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे व नगरसेवक श्री.संपत बारस्कर तसेच आर्ट ऑफ लिव्हींग यांचे संयुक्तविदयमाने वृक्षारोपण करण्यात आले.

जागतिक हवामान बदलामुळे वाढत चाललेले उष्णतामान, पावसाचे कोलमडलेले वेळापत्रक, वेळोवेळी उद्‌भवणारी नैसर्गिक संकटे या सर्वांमुळे पर्यावरण संवर्धनाच्यादृष्टीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आलेला होता व लागवड केलेल्या वृक्षांपैकी जास्तीत जास्त वृक्ष कसे जगतील याची काळजी नागरीकांनी घेणे तसेच लागवड केलेल्या वृक्षांची देखभाल योग्य रितीने केली जाते की नाही, यावर देखील लक्ष देणे गरजेचे आहे. यादृष्टीने सदर कार्यक्रमातून जनजागृती करण्यात आली.

या वनमहोत्सव काळात अहमदनगर मनपाला दिलेल्या उद्दिष्टापेक्षा ६०० वृक्ष जादा लावून ११४% वृक्षलागवड करण्यात आलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिका